न्यूज ब्रीफ

नागपूर भारतीय खाण ब्युरोच्या आस्थापनेवर ४ जागा, २९ पर्यंत संधी

छत्रपती संभाजीनगर | भारतीय खाण ब्युरो, नागपूर यांच्या आस्थापनेवरील अधीक्षक खाण भूवैज्ञानिक पदांच्या एकूण ४ जागा भरण्यासाठी पदानुसार पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यातील अर्ज मागवण्यात येत आहेत. अर्ज करण्यासाठीची अंतिम तारीख २९ सप्टेंबर आहे. इच्छुकांनी खाण नियंत्रक (पी & सी), दुसरा मजला, भारतीय खाण विभाग, इंदिरा भवन, सिविल लाइन्स, नागपूर, पिनकोड- ४४०००१ या पत्त्यावर अर्ज सादर करावेत, असे आवाहन केले.

ओडिशामध्ये प्राध्यापकांच्या १०६५ जागा भरणार, १३ ऑक्टोबरपर्यंत मुदत

छत्रपती संभाजीनगर | ओडिशामध्ये प्राध्यापक पदाच्या १०६५ जागा भरण्यासाठी पदानुसार पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत आहेत. त्यासाठी शैक्षणिक पात्रता पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. प्राध्यापक पदाच्या जागा बालासोर, बेरहामपूर, भुवनेश्वर, बोटांगि, कटक, जयपोर आणि संबलपूर या ठिकाणी जागा भरण्यात येणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी १३ ऑक्टोबरपर्यंत अर्ज सादर करावेत. अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी राज्य चयन बोर्ड ओडिशाच्या अधिकृत संकेतस्थळावर भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

उत्तर पश्चिम रेल्वेत दहावी उत्तीर्णांना संधी, १५ सप्टेंबरपर्यंत अर्जाची मुदत

छत्रपती संभाजीनगर | उत्तर पश्चिम रेल्वेमध्ये क्रीडा कोटाअंतर्गत विविध पदांच्या ५४ जागा भरण्यासाठी पदानुसार पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागवण्यात येत आहेत. या दहावी उत्तीर्ण तरुणांना नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. अर्ज करण्यासाठी उमेदवारांना १५ सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. अधिक माहिती व अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी rrcjapur.in या संकेतस्थळावर भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

नाबार्ड बँकेमध्ये ७७ जागा भरणार, २३ सप्टेंबरपर्यंत करता येणार अर्ज

छत्रपती संभाजीनगर | राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक नाबार्ड येथे विविध पदांच्या एकूण ७७ जागा भरण्यासाठी भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. यात निवड झालेल्या उमेदवारांना ४४ ते ८९ हजार रुपयांपर्यंतचे वेतन देण्यात येणार आहे. अर्ज करण्याची अंतिम तारीख २३ सप्टेंबर आहे. निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्रात नोकरी करावी लागेल. अधिक माहिती आणि अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी nabard.org.2023 या संकेतस्थळावर भेट द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

पवित्र पोर्टलवर ऑनलाइन अर्जाची अंतिम मुदत १५ सप्टेंबर असल्याने झाली गर्दी

शिक्षक भरतीच्या अर्जासाठी पदवी क्रमांक अनिवार्य, विद्यापीठामध्ये पदवीसाठी लोंढे

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर

पवित्र पोर्टलवर ३० हजार शिक्षकांच्या भरतीसाठी ऑनलाइन अर्ज भरणे सुरू आहे. पोर्टलवर पदवी प्रमाणपत्राचा अनुक्रमांक नोंदवावा लागतो. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात पदवी मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी तुफान गर्दी केली. परीक्षा व मूल्यमापन मंडळ कार्यालयात शुक्रवारपासून ही गर्दी आहे. प्रशासनाने शुल्क वसुली अन् अर्ज स्वीकृतीचे काउंटर वाढवलेत. बाहेरगावच्या विद्यार्थ- -वुवकांचे प्रचंड गैरसोय होत असल्याची तक्रार आहे. पण त्यांची राहण्याची सोय केल्याचे विद्यापीठाने म्हटले आहे.

पवित्र पोर्टलवर ऑनलाइन अर्जाची अंतिम मुदत १५ सप्टेंबर आहे. या पोर्टलवर पदवीचा अनुक्रमांक नोंदवणे अनिवार्य आहे. त्यामुळे विद्यापीठ कार्यकक्षेतील धाराशिव, बीड, जालना आणि छत्रपती संभाजी नरातून मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांचे लोंढे येत आहेत. अहोरात्र शंभर पदवी प्रमाणपत्रे देण्याची तयारी असते. पण दररोज चारशे ते पाचशे विद्यार्थी आल्यामुळे परीक्षा विभागावर ताण आला आहे.

परीक्षा भवनाच्या बाहेर विद्यार्थी, पालकांनी गर्दी केली होती.

कॅश काउंटर वाढवले तरीही दहापर्यंत पदवी वितरण

१. दोन कॅश काउंटर वाढवले.
२. काउंटर बाहेर लावले. टोकन सिस्टिम सुरू केली.
३. दुसऱ्या दिवशी पदवी प्रमाणपत्र वितरित केले जात आहे.
४. बाहेरील विद्यार्थ्यांना राहण्याची मोफत व्यवस्था केली.
५. रात्री दहापर्यंत काम करण्याच्या सूचना, स्टाफला जेवणाची व्यवस्था विद्यापीठाने केली.
६. पदवीवर हस्ताक्षरात नव्हे लिहिण्यासाठी एकदोनजी तीन जणांना नेमले.
७. मार्क्स मेमो, पहिली पदवी अन् दुसऱ्या पदवी देण्याचे काम आता सुरळीत.

राहण्याची व्यवस्था केली

परीक्षा विभागातील अन्य कामे तात्पुरती बंद करून पदवी देण्याचे काम करण्याच्या सूचना दिल्या. बाहेरील युवकांची राहण्याची व्यवस्था फॅकल्टी हाऊसमध्ये केली. गुरुवारी हे काम संपेल.
-डॉ. भगवान साखळे, कुलसचिव

गर्दी नियंत्रित करणे अवघड

मी शुक्रवारपासून स्टाफ वाढवून देण्याची मागणी करत होतो. पण सुरुवातीला कुणीही गांधीगिरी घेतली नाही. आता स्टाफ दिला, पण उशीर झाल्यामुळे गर्दी कंट्रोल करणे अवघड बनले. बाहेरील युवकांची गैरसोय झाली. **-प्रा. हरिदास सोमवंशी,** अधिसभा सदस्य

शिक्षकांच्या तीस हजार जागा, १५ पर्यंत मुदत

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर

बहुचर्चित शिक्षक भरतीला राज्यात सुरुवात झाली आहे. ३० हजार जागांसाठी राज्यभरात भरती केली जाणार आहे. त्यासाठी पवित्र पोर्टलमार्फत शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धिमत्ता चाचणी २०२३ परीक्षा दिलेल्या उमेदवारांचे स्व-प्रमाणपत्र तयार करण्याच्या प्रक्रियेलाही सुरुवात झाली आहे. १५ सप्टेंबरपर्यंत स्व-प्रमाणपत्र पूर्ण करण्याची मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे टीईटी परीक्षा दिलेल्या उमेदवारांचे अनेक वर्षांपासूनचे शिक्षक होण्याचे स्वप्न आता पूर्ण होणार आहे.

सहा महिन्यांपूर्वीच शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धिमत्ता चाचणी ही परीक्षा दिलेल्या दोन लाख १६ हजार विद्यार्थ्यांना आवश्यक असलेल्या सूचना, जागांची माहिती https://mahateach erecruitment.org.in . या पोर्टलवर प्रदर्शित केली जाणार आहे. परंतु, ढोबळमानाने ३० हजार जागांसाठी ही भरती प्रक्रिया राबवण्यात येणार असल्याचे राज्याचे शिक्षण आयुक्तालयाकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, गुणवत्तेनुसार उमेदवारांचे पसंतीक्रम घेण्यात येतील. त्यानंतर निवड यादी तयार करूनच नियुक्ती दिली जाईल. दरम्यान, मागील परीक्षांमध्ये गैरप्रकार करणाऱ्या तसेच संबंधित गैरप्रकारात सहभाग असल्याचे आढळून आले होते. अशा संबंधितांना या भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार नसल्याचे औरंगाबाद खंडपीठाने स्पष्ट केले आहे. रिक्त जागांची माहिती लवकरच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. शिक्षणमंत्र्यांच्या आदेशानुसार भरती करणार असल्याची माहिती शिक्षण आयुक्त सूरज मांढरे यांनी दिली.

पुरवणी परीक्षेच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदविका प्रवेशासाठी आजची मुदत

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर

दहावी आणि बारावीनंतरच्या अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान पदविका अभ्यासक्रम प्रवेशासाठीची अंतिम मुदत (कटऑफ डेट) तंत्रशिक्षण संचालनालयाने जाहीर केली आहे. त्यामुसार पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी १४ सप्टेंबर ही अंतिम मुदत देण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी राज्यातील शासकीय, खासगी अनुदानित, विद्यापीठ संचलित आणि खासगी विनाअनुदानित पदविका शिक्षण संस्थांमध्ये दहावी आणि बारावीनंतरच्या पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. दहावी आणि बारावीच्या निकालानंतर नियमित विद्यार्थ्यांसाठीची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. ही प्रवेश प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांनाही प्रवेश प्रक्रियेत सामावून घेण्यात आले. या पार्श्वभूमीवर तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनी प्रवेशासाठीची अंतिम मुदत आणि अन्य सूचना परिपत्रकाद्वारे जाहीर केल्या आहेत.

संस्थांना १५ सप्टेंबरला द्यावी लागेल माहिती

संस्थांनी १२ सप्टेंबरपर्यंत प्रवेश प्रक्रिया पूर्ण करून प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची माहिती १५ सप्टेंबरला ऑनलाइन भरायी. मात्र या तारखा अस्थायी स्वरूपाच्या आहेत. काही अपरिहार्य परिस्थितीत बदल झाल्यास सुधारित वेळापत्रक https://poly23 dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल, असे पत्रात स्पष्ट केले आहे.

मनपाच्या ११४ जागांच्या भरतीसाठी ९८०० अर्ज

छत्रपती संभाजीनगर | महापालिकेत आयबीपीएस कंपनीकडून भरती प्रक्रिया राबवण्यात येते आहे. पहिल्या टप्प्यात महत्त्वाच्या ११४ पदांसाठी जाहिरात काढण्यात आली होती. त्यासाठी ९८०० अर्ज आले आहेत. रिक्त पदांच्या गरजेनुसार १२५ पदे भरण्यासाठी राज्य शासनाने महापालिकेला परवानगी दिली आहे. त्यासाठी आस्थापना खर्चाच्या मर्यादेला सूट देण्यात आली असून प्रशासनाने वर्ग १ ते ३ मधील निवडक पदे भरण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्यात आरोग्य, लेखा, लेखापरीक्षण, उद्यान, अभियांत्रिकी, अग्निशमन विभागातील ११४ पदांचा समावेश आहे. १२ सप्टेंबरपर्यंत या ११४ जागांसाठी ९,८०० उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले असल्याचे कळवले आहे. . लवकरच वेळापत्रक जाहीर होणार आहे.

उद्योगाच्या कुशल मनुष्यबळासाठी 'मसिआ'त कार्यशाळा

छत्रपती संभाजीनगर | भारत घेण्याचा आली. मसिआ स्किल सरकारच्या कौशल्य विकास आणि डेव्हलपमेंट सेंटरचे संयोजक अर्जुन उद्योजकता प्रशिक्षण विभाग मंत्रालयाने गायकवाड यांनी मसिआच्या 'स्ट्राइक मंजूर केलेल्या मसिआ स्ट्राइक प्रोजेक्ट'चा आजपर्यंतचा आढावा प्रकल्पांतर्गत एचआर आणि सादर केला. या वेळी मसिआचे अध्यक्ष सुपरवायझरसाठी १३ सप्टेंबर रोजी अनिल पाटील, रविशंकर कोरगल, चिकलठाणा येथील मसिआ संजय गौरशेट्टे यांनी उपस्थितांना कार्यालयात एकदिवसीय कार्यशाळा प्रकल्पाची माहिती दिली.

डॉ. इंदिराबाई पाठक कॉलेजात पाककला स्पर्धा

डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयात गृहशास्त्र विभागांतर्गत राष्ट्रीय पोषण महानिमित्त पाककला स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेसाठी २०२३-२४ हे वर्ष जागतिक भरड धान्य वर्ष म्हणून साजरे करण्यात येत आहे. त्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी पाककलेची थीम सादर केली.

'सारथी' संस्थेचे वसतिगृह सुरू करा : आमदार सतीश चव्हाण

छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर येथे विद्यार्थ्यांसाठी सारथी संस्थेचे वसतिगृह सुरू करावे, अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. राज्य शासनाच्या महसूल विभागाकडून छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेच्या वतीने छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय मुख्यालय सुरू करण्यासाठी तसेच छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व लक्षित गटातील लाभार्थीसाठी अभ्यासिका, मुला-मुलींना वेगवेगळ्या वसतिगृहासाठी गारखेडा परिसरातील सीटीएस क्र. १५३०९ मधील १.२४ हेक्टर आर जमीन नियोजन विभागास प्रदान करणे, प्रकल्पाच्या बांधकाम व संचालनाचे काम सारथी संस्थेमार्फत करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मात्र, प्रशासकीय मान्यता मिळवून वर्ष होऊनही अद्यापही यासंदर्भात काहीच कार्यवाही झाली नसल्याचे चव्हाण यांनी निवेदनातून पवार यांच्या निदर्शनास आणून दिले.

बिडकीन ग्रामपंचायतीमध्ये गैरव्यवहार; सरपंच, ग्रामविकास अधिकाऱ्यावर गुन्हा

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर

पैठण तालुक्यातील सर्वाधिक मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या बिडकीन येथील ग्रामपंचायतीमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांतून मिळालेल्या ६८ लाख २८ हजार ५५० रुपांच्या निधीचा अपहार केला होता. याप्रकरणी उद्धव ठाकरे गटाचे तालुकाप्रमुख मनोज पेरे यांच्या पत्नी तत्कालीन सरपंच सारिका मनोज पेरे व ग्रामविकास अधिकारी एन. डी. पाडळे यांच्याविरुद्ध बिडकीन पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी विस्तार अधिकारी देविदास तोतारम गवळी (५३, पंचायत समिती, पैठण) यांनी तक्रार दिली.

बिडकीन ग्रामपंचायतीअंतर्गत राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांतर्गत ८ ते १५ मे २०२१ या कालावधीत मग्रारोहयो रोजगार हमी योजनेतर्गत सोमपुरी ते मदासा या रस्त्याच्या कामावर १ लाख २३ हजार व २०२०-२०२१ मध्ये १४ व्या वित्त आयोगातून आलेले १७,०५,५५० रुपये पेव्हर ब्लॉक, सिमेंट रस्ता, ड्रेनेजलाइन, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत लाभार्थी अहमदखाँ सरदारखाँ पठाण यांना लाभ दिल्याचे दाखवले. मात्र, ऑनलाइन नोंदणी दुसऱ्या लाभार्थीच्या नावे दाखवण्यात आली. तत्कालीन सरपंच सारिका पेरे व ग्रामविकास अधिकारी पाडळे यांनी संगनमत करून ६८ लाख २८ हजार ५५० रुपांच्या अपहार केल्याचे चौकशीतून निष्पन्न झाले.

जिल्हा परिषद सीईओंची परवानगी घेतली नाही

जिल्हा विकास निधी कर्जअंतर्गत बांधकाम केलेले दुकान गाळे मर्जीप्रमाणे वाटप करून साहित्य खरेदीच्या निविदा प्रणालीच्या वापर न करणे, एकाच दिवशी एकाच पुरवठादाराच्या नावाने वेगवेगळे धनादेश देण्यात आले. यासंदर्भात जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची कुठलीही परवानगी न घेता तत्कालीन ग्रामविकास अधिकारी व सरपंचांनी जमा केल्याचे निदर्शनास आले.

ग्रामसभा नोंदवही उपलब्ध करून दिल्यात आली नाही. वारंवार मागणी करूनही कामासंबंधीचे फोटो उपलब्ध करून दिले नाही. शासनाच्या निधीचा (६८ लाख २८ हजार ५५० रुपये) अपहार केल्याप्रकरणी तत्कालीन ग्रामविकास अधिकारी व सरपंचाविरुद्ध बिडकीन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक निरीक्षक गणेश सुरवसे तपास करीत आहेत.

एन-५ येथे ज्वेलर्सचे शटर उचकटून साडेसहा लाखांचे सोने-चांदीचे दागिने लंपास

छत्रपती संभाजीनगर | ज्वेलर्स दुकानाचे शटर उचकटून चोरट्यांनी सहा किलो चांदीसह तीन तोळ्यांचे दागिने असा एकूण ६ लाख ५० हजार रुपयांचे दागिने लंपास केले. ही घटना १३ सप्टेंबर रोजी एन-५ भागातील राजीव गांधी मैदानजवळील कलश ज्वेलर्समध्ये घडली. याप्रकरणी सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी अमोल अरुण पवार (३१, रा. एस. टी. कॉलनी, एन-२ सिडको) यांनी फिर्याद दिली. पवार यांचे राजीव गांधी स्टेडीयम कॉम्पलेक्स, एन-५ सिडको येथे कलश ज्वेलर्स नावाचे सोने-चांदी ज्वेलरीचे दुकान आहे. ते दुकान अमोल व त्यांचा भाऊ अभिलाष दोघेही चालवतात. १२ सप्टेंबर रोजी रात्री ९ वाजता अभिलाषने दुकान बंद करून घरी गेला. दुसऱ्या दिवशी १३ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजता दुकानाच्या बाजूला असलेल्या हॉटेल मालकाने फिर्यादीला फोन करून दुकानाचे शटर उचकटल्याचे सांगितले. दरम्यान, दोन्ही भावांनी धाव घेत दागिन्यांची पाहणी केली असता, दीड लाखांची नथ, कानातील बाळी, अंगठी असे तीन तोळे सोन्याचे दागिने आणि चांदीच्या असलेल्या देवाच्या मूर्ती, पैंजण, कंरडे असे एकूण सहा किलो चांदी चोरी गेल्याचे समजले. या सर्व ऐवज ६ लाख ५० हजार रुपयांचा असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

'ईव्ही'मध्ये रोजगाराची मोठी संधी; ऑटो क्लस्टरमध्ये झाले चर्चासत्र

नायर यांनी शिक्षक, विद्यार्थ्यांशी प्रश्न उत्तराच्या माध्यमातून संवाद साधला.

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर

देशात वेगाने वाढणाऱ्या ईव्ही (इलेक्ट्रिक व्हेइकल) उद्योगाचे भविष्य उज्ज्वल असून विद्यार्थ्यांना या क्षेत्रात संशोधन, इनोव्हेशनमध्ये मोठी संधी आहे. वेगाना काळ हा ईव्हीचा असणार आहे. त्यामुळे तुम्हीसुद्धा काळाशेवत चालले पाहिजे, असे मत आय क्रिएटर संस्थेच्या वरिष्ठ व्यवस्थापक रुक्डिस नायर यांनी व्यक्त केले. वाळूज येथील मराठवाडा ऑटो क्लस्टर, सीएमआयए आणि मॅजिकच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी दुपारी चर्चासत्र आयोजित केले असता त्या वेळी ते बोलत होते. या वेळी अभियांत्रिकीचे ३५७ विद्यार्थी उपस्थित होते. मॅजिकचे संचालक आशिष गर्दे यांनी औरंगाबाद मिशन फॉर ग्रीन मोबिलिटी उपक्रमाची माहिती दिली.

५६ लाखांचे बक्षीस देणार

ईव्ही भागधारकांना एकत्र आणण्याच्या उद्देशाने टेक स्टार्टअपचा भारतातील आघाडीचा इन्क्युबेटर आय-क्रिएटद्वारे देशातील सर्वात मोठ्या इलेक्ट्रिक व्हेइकल इनोव्हेशन चॅलेंज इंडीएंजेलिस-२३ या स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना एकूण ५६ लाख रुपांचे बक्षीस मिळणार असल्याचे सांगण्यात आले.

आता जड ईव्ही वाहने दिसणार : देशात ईव्हीसाठी पोषक वातावरण निर्माण व्हावे, यासाठी इंडीएंजेलिस उपक्रम महत्त्वाची भूमिका निभावत असून यंदाची तिसरी आवृत्ती जड इलेक्ट्रिक वाहने, अर्थमूव्हर्स आणि मायनिंग ट्रकसह विविध प्रकारच्या वाहनांवर लक्ष केंद्रित करणार आहे.

चेतना फाउंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत

दुर्दम्य इच्छाशक्तीच तुम्हाला यशप्राप्ती करून देते : धानोरकर

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर

यश संपादन करण्यासाठी ध्येय निश्चित करावे लागते. तुमची दुर्दम्य इच्छाशक्तीच तुम्हाला यशप्राप्ती करून देते. तुम्ही भाग्यवान आहात, तुमच्या शिक्षणासाठी चेतना फाउंडेशनसारखी संस्था 'पालक' बनून पुढे आली आहे, असे मत उपजिल्हाधिकारी अंजली धानोरकर यांनी व्यक्त केले. चेतना एम्पॉवरमेंट फाउंडेशनच्या वतीने रविवारी आयोजित केलेल्या 'हौसलों की उडान' कार्यक्रमात त्यांनी आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्या वेळी त्या बोलत होत्या. फाउंडेशनने उच्च शिक्षण घेण्यासाठी आजवर १८७ विद्यार्थ्यांना, तर १० सप्टेंबर रोजी ७७ विद्यार्थ्यांना आर्थिक स्वरूपात सहकार्य केले.

फाउंडेशनचे अध्यक्ष विक्रेक रांदड यांनी प्रास्ताविक केले. या वेळी जि. प. अतिरिक्त आयुक्त डॉ. सुनील भोकरे यांनी फाउंडेशनच्या कामाचे कौतुक करून मदत करणाऱ्यांनी मदत करण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. या वेळी हेमा फाउंडेशनचे अध्यक्ष महेंद्र काबरा, बी. बी टोबरे, डॉ. राजेंद्र कांबळे उपस्थित होते. सायत्री रांदड यांनी सूत्रसंचालन केले. मुरली गुंगे यांनी आभार मानले.

विवाहितेची गळफास घेत आत्महत्या; पतीविरोधात गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर | मुकुंदवाडी परिसरातील बिनायकनगर येथील विवाहितेने कुकताच गळफास घेऊन आत्महत्या केली. याप्रकरणी मृत विवाहितेच्या आईने चारित्र्यावर संशय घेऊन पती सुधाकर हा तिला मानसिक व शारीरिक त्रास देता होता. या छळाला कंटाळून विवाहितेने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची तक्रार दिली आहे. याप्रकरणी पती सुधाकर भास्कर बरकले याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पान १ वरून

वीज गेली, जलवाहिनीही फुटली; सलग दुसऱ्या दिवशी...

वीज उपकेंद्रात बुधवारी (१३ सप्टेंबर) सायंकाळी स्पार्किंग होऊन पाणीपुरवठ्याच्या दोन्ही योजना बंद पडल्या. याच वेळी नक्षत्रवाडीजवळ १,२०० मिलिमीटर व्यासाची मुख्य जलवाहिनी फुटली. शहराला जायकवाडीहून ९०० आणि १२०० मिमी व्यासाच्या जलवाहिन्यांतून पाणीपुरवठा केला जातो. जायकवाडी धरणातून पाण्याचा उपसा करण्यासाठी धरणाच्या परिसरात एक हाऊस उभारण्यात आले आहे. तेथे २४ तास वीजपुरवठा व्हावा, यासाठी याच परिसरात विजेचे उपकेंद्र सुरू केले आहे. उपकेंद्रातून पंपहाऊससाठी एक्स्प्रेस फीडर देण्यात आले आहे. पंपहाऊस, वीज उपकेंद्रात वारंवार होणाऱ्या बिघाडामुळे पाणीपुरवठा विस्कळीत होत आहे. जलवाहिन्यांचा एअर व्हॉल्व फुटला बुधवारी सायंकाळी ४.५५ वाजता पंपहाऊसच्या परिसरातील वीज उपकेंद्रात स्पार्किंग झाल्याने पाणीपुरवठ्याच्या दोन्ही योजना बंद पडल्या. त्याअगोदर दुपारी चारच्या सुमारास नक्षत्रवाडी येथे १,२०० मिलिमीटर व्यासाची जलवाहिनी फुटली. सध्या ७०० मिमी व्यासाच्या जुन्या योजनेच्या बळकटीकरणाचे काम केले जात आहे. त्यासाठी ९०० मिमी व्यासाची जलवाहिनी टाकण्यात येत आहे. जायकवाडी ते नक्षत्रवाडीदरम्यान ३९ किलोमीटरची ९०० मिलिमीटर व्यासाची जलवाहिनी टाकण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तीन कंत्राटदारांना काम बाटून दिले आहे. यापैकी श्रीहरी असोसिएट्सच्या माध्यमातून नक्षत्रवाडीजवळ ९०० मिमी व्यासाची जलवाहिनी टाकताना जेसीबी मशीनचा धक्का लागून १,२०० मिलिमीटर व्यासाच्या जलवाहिनीचा एअर व्हॉल्व फुटला आणि हजारो लिटर पाणी वाया गेले, अशी माहिती पालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून देण्यात आली. जलवाहिनीतील सर्व पाणी बाहेर पडल्यावर दुरुस्तीचे काम सुरू केले जाईल, असेही पालिकेने म्हटले आहे.

सातारा, देवळाईत ड्रेनेजचे सर्वेक्षण सुरू

होणार आहे. दिवाळीपूर्वी प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे. मनपाने या कामाचा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवला. त्यानंतर केंद्र सरकारच्या 'अमृत-२'मध्ये समावेशासाठी नवा प्रस्ताव सादर करण्यात आला. राज्य शासनाच्या उच्चाधिकार समितीने मंजूरी देत सातारा, देवळाई ड्रेनेज प्रकल्पाचा समावेश 'अमृत-२'मध्ये केला. त्यानंतर महापालिकेने या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया राबवली. तीन कंत्राटदार कंपन्यांनी निविदा सादर केल्या. त्यापैकी अहमदाबाद येथील अंकिता इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीशी वाटाघाटी करून ११ टक्के जास्त दराने निविदा अंतिम करण्यात आली.

'पीईएस' वाचवण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयावर धडकला मोर्चा

मोठ्या संख्येने उपस्थिती होती. हातात निळे झेंडे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कटआऊट घेऊन तरुण वर्गापासून ते वयोवृद्धापर्यंत महिला, पुरुष मोर्चामध्ये सहभागी झाले होते. विभागीय आयुक्तांना मागण्यांचे निवेदन दिले. अतिक्रमण हटवण्यासाठी जनआंदोलनाची भूमिका घेतली जाणार असल्याचे सांगितले. या वेळी पोलिसांचा मोठा बंदोबस्त होता. मैदानावर सह्यांची अन् नावनोंदणीची मोहीम मिलिंद हायस्कूलच्या मैदानावर घेण्याचा तरुण वर्ग, वयोवृद्ध आणि संस्थेशी जिव्हाळा असलेले एकजूट होऊन जय भीम...जय भीमच्या घोषणा देत होते. काही मिलिंद के सम्मान में ...हम सब मैदान में..., डॉ. बाबासाहेब के सम्मान में ..हम सब मैदान में..., अशा घोषणा देत होते. प्रत्येक समाजबांधवाने या ठिकाणी नोंदणी केली होती. तरुणवर्ग स्वाक्षरी बोर्डावर स्वाक्षरी करून पाठिंवा दर्शवत होता. बोर्ड सह्यांनी भरल्याने उंचावर असलेल्या ठिकाणी यही करण्यासाठी अक्षरश: खांद्यावर बसून तरुणांनी स्वाक्षरी केली.

धार्मिक भावना दुखावल्याप्रकरणी ८ जणांवर गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर | शहानूरमियाँ दर्गा परिसरातील मजार काढल्याप्रकरणी एका बोधकाम व्यावसायिकासह सात-आठ जणांवर बुधवारी उस्मानपुरा ठाण्यात गुन्हा दाखल झाला. गुन्हा दाखल झाला. हा प्रकार मंगळवारी घडला. याप्रकरणी शेख अनिसोद्दीन शेख सफीद्दीन (४८, रा. शहानूरवाडी) यांनी फिर्याद दिली. शेख मजारीची देखरेख करून संवलने आयोजन करतात. एका बांधकाम व्यावसायिकाने काही मजुरांना हाताशी धरून ही मजार हलवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे घटनास्थळी मोठा जमाव जमरा होता. या जमावाला पाणकण्यासाठी घटनास्थळी मोठा बंदोबस्त तैनात होता.

Admission Notification A.Y. 2023-24
Mitra Sadhana Shikshan Prasarak Mandal's
UDPIP
Usha Dwarkadas Pathrikar Institute of Pharmacy
Dongargaon (Kawad),Tq.Phulambri, Dist.Chhatrapati Sambhaji Nagar (M.S)431111
Affiliated to M.S.B.T.E. Mumbai, P.C.I. Approved
DTE CODE-2565
Admission Open for First Year D. Pharmacy A.Y. 2023-24
Admission applications are invited from eligible students for Against CAP & Institute Level for D. Pharmacy
Note: -For all admission schedule, refer college notice board &website.
Web: www.udpip.org; Email- udpip2016@gmail.com
Principal: 8847756222 Office :- 8847756111At. At. Dongargaon(Kawad),Tq.Phulambri, Dist. Chhatrapati Sambhaji Nagar (M.S)431111

Admission Notification A.Y.2023-24
Mitra Sadhana Shikshan Prasarak Mandal's
Late Bhagirathi Yashwantrao Pathrikar College of D. Pharmacy
At. Pathri, Tq.Phulambri, Dist. Chhatrapati Sambhaji Nagar, (M.S)431111
Affiliated to M.S.B.T.E. Mumbai, P.C.I. Approved
DTE CODE-2547
Admission Open for First year D. Pharmacy A.Y.2023-24
Admission applications are invited from eligible students for Against CAP & Institute Level for D. Pharmacy
Note: -For all admission schedule, refer college notice board &website.
Web: www.bypcop.com ; Email- lbypcop2018@gmail.com
Principal: 7719075188 Office :-7798468849
At. Pathri Tq.Phulambri, Dist. Chhatrapati Sambhaji Nagar (M.S) 431111